Epaper

डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल

MSME - MH-33 -0714843

दैनिक

# जन सम्राट टाईम्स

सत्याचे प्राईम्स

मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

। बुधवार, दि. १० जून २०२६ । वर्ष १ ।अंक ६५ ।पाने २।

DIGITAL EDITION

रायगडच्या पालकमंत्री पदावरून शिवसेना आक्रमक

(पान २ वर)



Selected

### राज्यात पावसाची दमदार हजेरी ३० जिल्ह्यांना यलो अलर्ट

मुंबई:उकाडा आणि घामाच्या धारांनी हैराण झालेल्या महाराष्ट्रातील नागरिकांना आता लवकरच दिलासा मिळण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. भारतीय हवामान विभागाने (IMD) राज्यातील तब्बल ३० जिल्ह्यांसाठी यलो अलर्ट जारी केला असून, पुढील काही दिवस अनेक भागांत वादळी वाऱ्यांसह मेघगर्जना आणि पावसाची शक्यता वर्तवली आहे. विशेषतः मुंबई, ठाणे, पुणे आणि संपूर्ण कोकण पट्ट्यात पावसाचा प्रभाव अधिक जाणवू शकतो. यलो अलर्ट जारी करण्यात आलेल्या जिल्ह्यांमध्ये मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, नाशिक, अहमदनगर, धुळे, नंदुरबार, बीड, परभणी, लातूर, धाराशिव, नांदेड, हिंगोली, अकोला, अमरावती, नागपूर, चंद्रपूर, भंडारा, गोंदिया, वर्धा, वाशीम आणि यवतमाळ या जिल्ह्यांचा समावेश आहे.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीत महत्त्वाचे निर्णय

# मंत्रिमंडळ निर्णय : मंत्रालयात 33 ऐवजी 45 विभाग!

## शैक्षणिक मान्यतेला मुदतवाढ आणि एमआयडीसीची कर्जक्षमता वाढविण्याला मंजुरी

जन सम्राट टाईम्स

मुंबई : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत प्रशासन अधिक गतिमान करण्याच्या दृष्टीने अनेक महत्त्वपूर्ण निर्णयांना मंजुरी देण्यात आली. मंत्रालयीन विभागांची पुनर्रचना, औद्योगिक विकासाला बळ देण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्याआर्थिक क्षमतेत वाढ अशा विविध निर्णयांमुळे राज्याच्या विकास प्रक्रियेला नवी दिशा मिळणार असल्याचे मानले जात आहे.

- ३३ विभागांचे ४५ विभागांमध्ये पुनर्रचना
- प्रत्येक विभागाला स्वतंत्र सचिव
- अभ्यासक्रमांच्या मान्यतेसाठी ३० जूनपर्यंत मुदतवाढ

मंत्रिमंडळाने मंत्रालयातील विद्यमान ३३ विभागांचे विभाजन करून त्यांची संख्या ४५ करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. अनेक विषय एकाच विभागाकडे असल्यामुळे फाईल निकाली काढण्यास होणारा विलंब आणि प्रशासकीय गुंतागुंत कमी करण्यासाठी ही पुनर्रचना करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, या बदलासाठी कोणतीही नवीन पदनिर्मिती करण्यात आलेली नाही. उपलब्ध मनुष्यबळ आणि संसाधनांचे फेरवाटप करून प्रत्येक विभागासाठी स्वतंत्र सचिवांची व्यवस्था करण्यात येणार आहे. त्यामुळे निर्णयप्रक्रिया अधिक कार्यक्षम आणि जलद होण्याची अपेक्षा सरकारने व्यक्त केली आहे. उच्च व तंत्रशिक्षण क्षेत्रालाही मंत्रिमंडळाच्या निर्णयातून मोठा दिलासा मिळाला आहे. शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी नवीन महाविद्यालये, नवीन अभ्यासक्रम आणि अतिरिक्त तुकड्यांना मान्यता मिळविण्याची



अंतिम मुदत आता ३० जून २०२६ पर्यंत वाढविण्यात आली आहे. यामुळे विविध शैक्षणिक संस्था, व्यवस्थापन मंडळे आणि विद्यार्थ्यांना नियोजनासाठी अधिक वेळ उपलब्ध होणार असून, प्रवेश प्रक्रियेत सुसूत्रता निर्माण होण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. राज्यातील औद्योगिक विकासाला अधिक चालना देण्यासाठी मंत्रिमंडळाने महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ मध्ये आवश्यक बदल करण्यास मंजुरी दिली आहे.

### प्रशासन अधिक सक्षम करण्याच्या दिशेने पाऊल

राज्य सरकारने घेतलेल्या या निर्णयांकडे केवळ प्रशासकीय फेरबदल म्हणून नव्हे, तर शासन व्यवस्थेला अधिक परिणामकारक आणि लोकाभिमुख बनविण्याच्या प्रयत्नाच्या रूपात पाहिले जात आहे. मंत्रालयीन कामकाजातील विलंब कमी करणे, शिक्षण क्षेत्रातील प्रक्रिया सुलभ करणे आणि उद्योगांसाठी आर्थिक क्षमता वाढविणे या तिन्ही आघाड्यांवर सरकारने धोरणात्मक पावले उचलल्याने राज्याच्या सर्वांगीण विकासाला गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

या सुधारणेमुळे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) याची कर्ज उभारणी क्षमता वाढणार असून, मोठ्या पायाभूत सुविधा प्रकल्पांसाठी निधी उपलब्ध करणे अधिक सुलभ होणार आहे. या निर्णयामुळे नवीन औद्योगिक वसाहती, पायाभूत सुविधा आणि गुंतवणूक प्रकल्पांना गती मिळण्याबरोबरच राज्यातील रोजगारनिर्मितीलाही चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.उच्च व तंत्रशिक्षण क्षेत्रालाही मंत्रिमंडळाच्या निर्णयातून मोठा दिलासा मिळाला आहे.

जन सम्राट टाईम्स — ब्रेक न्यूज

# नगरपरिषदेच्या विनापावती बाजार वसुलीची तक्रार!

## नगर विकास शाखेकडून तक्रारीची दखल



जन सम्राट टाईम्स

**जळगाव | प्रतिनिधी:** नशिराबाद नगरपरिषदेच्या आठवडे बाजारातील कथित विनापावती वसुलीप्रकरणी जळगाव जिल्हाधिकारी कार्यालयात अधिकृत तक्रार दाखल करण्यात आल्याने प्रशासकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. बाजारातील व्यापारी आणि विक्रेत्यांकडून कोणतीही अधिकृत पावती न देता शुल्क वसूल केले जात असल्याचा आरोप करत या संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र चौकशी आणि विशेष लेखापरीक्षण (स्पेशल ऑडिट) करण्यात यावे, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते भूषण भानुदास कोल्हे यांनी केली आहे. या संदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नगर विकास शाखेत सादर करण्यात आलेल्या तक्रार अर्जाची अधिकृत दखल घेण्यात आली असून, संबंधित प्रकरणात पुढील प्रशासकीय हालचालींकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे. तक्रारीनुसार, नशिराबाद येथील आठवडे बाजारात व्यापारी, फेरीवाले आणि लहान विक्रेत्यांकडून बाजार शुल्क व जागा भाड्याच्या नावाखाली वसुली केली जाते. मात्र, अनेक प्रकरणांमध्ये संबंधित कर्मचाऱ्यांकडून अधिकृत नगरपरिषद पावती किंवा मशीनद्वारे पावती न देता थेट रोख रक्कम स्वीकारली जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

### शिस्तभंग कारवाई करण्याची मागणी

तक्रार अर्जात महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मधील संबंधित तरतुदींचा उल्लेख करण्यात आला असून, महसुलातील अनियमितता रोखणे ही मुख्याधिकाऱ्यांची जबाबदारी असल्याचे नमूद करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर कर्तव्यात निष्काळजीपणा झाल्याचा आरोप करत संबंधित अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्याची मागणीही करण्यात आली आहे.

# धुळे मनपाची बाजार फी की गोरगरीबांवरील आर्थिक गदा? दरमहा ₹७५० आकारणी

## फेरीवाले, लोटगाडीधारक आणि किरकोळ विक्रेत्यांमध्ये तीव्र नाराजी

जन सम्राट टाईम्स

**धुळे | प्रतिनिधी:** धुळे महानगरपालिकेकडून शहरातील लोटगाडीधारक, फेरीवाले, फुटपाथ विक्रेते आणि किरकोळ व्यवसायिकांकडून बाजार फीच्या नावाखाली दरमहा ₹७५० शुल्क आकारले जात असल्याचा आरोप समोर आला असून, यामुळे गोरगरीब विक्रेत्यांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. प्रत्यक्ष व्यवसाय किती दिवस झाला, किती दिवस बंद राहिला किंवा पावसामुळे किती दिवस उत्पन्नच झाले नाही, याचा विचार न करता एकसमान शुल्क आकारले जात असल्याने विक्रेत्यांनी या पद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. शहरातील बहुतांश फेरीवाले आणि लोटगाडीधारक हे रोजच्या उत्पन्नावर आपला उदरनिर्वाह करतात. दिवसाची कमाई झाली तरच घरातील चूल पेटते; अन्यथा संपूर्ण कुटुंब आर्थिक



संकटाला सामोरे जाते. अनेकांनी व्यवसाय सुरू करण्यासाठी खासगी सावकारांकडून मोठ्या व्याजाने कर्ज घेतले असून, वाढती महागाई आणि घटते उत्पन्न यामुळे त्यांची परिस्थिती आधीच बिकट झाली आहे. अशा परिस्थितीत व्यवसाय झाला किंवा नाही, विक्रेता आजारी होता किंवा नाही, पाऊस पडला किंवा नाही, तरीही पूर्ण महिन्याचे शुल्क आकारले जात असल्याने विक्रेत्यांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. सध्या सुरू असलेल्या पावसाळ्यात सलग दोन ते चार दिवस मुसळधार पावसामुळे रस्त्यावरील व्यवसाय पूर्णपणे ठप्प होतो. ग्राहकांची वर्दळ कमी होते आणि अनेकदा विक्रेत्यांना घराबाहेरही पडता येत नाही. काही ठिकाणी शनिवार-रविवार व्यवसाय बंद राहतो. अशा वेळी प्रत्यक्ष उत्पन्नच नसताना पूर्ण महिन्याचे शुल्क आकारणे ही बाब सर्वसामान्य विक्रेत्यांच्या आकलनापलीकडची असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. फेरीवाले आणि लहान व्यवसायिकांमध्ये सध्या एकच प्रश्न चर्चिला जात आहे – "ज्या दिवशी व्यवसायच झाला नाही, त्या दिवसाचे शुल्क कोणत्या आधारावर आकारले जाते?" महसूलवाढीच्या उद्देशाने व्यवसाय नसतानाही शुल्क आकारण्याची सक्ती गोरगरीबांवर अतिरिक्त आर्थिक भार टाकणारी असल्याचा आरोप विक्रेत्यांकडून केला जात आहे. शुल्क आकारताना प्रत्यक्ष व्यवसायाचे दिवस, पावसाळा, आजारपण आणि इतर अपरिहार्य परिस्थितींचा विचार करावा, अशी त्यांची मागणी आहे.

# रेल्वे स्थानकावर खाली पडलेले वडे विकणारा गजाआड!

## व्हायरल व्हिडिओनंतर रेल्वे प्रशासनाची तातडीची कारवाई

जन सम्राट टाईम्स

**भुसावळ,। प्रतिनिधी:** रेल्वे स्थानकावरील प्लॅटफॉर्मवर खाली पडलेले वडे पुन्हा उचलून प्रवाशांना विक्री केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आल्यानंतर भुसावळ रेल्वे प्रशासनाने संबंधित विक्रेत्यावर तातडीने कठोर कारवाई केली आहे. सोशल मीडियावर या घटनेचा व्हिडिओ व्हायरल होताच प्रशासनाने प्रकरणाची गंभीर दखल घेत सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे संबंधित विक्रेत्याची ओळख पटवून त्याला ताब्यात घेतले आहे. प्रवाशांच्या आरोग्याशी थेट खेळ करणाऱ्या या प्रकारामुळे रेल्वे प्रशासनाने संबंधित खाद्यपदार्थ विक्री स्टॉल तात्पुरता सील केला असून, या संपूर्ण प्रकरणासाठी जबाबदार मानल्या जाणाऱ्या मुख्य परवानाधारक अर्थात ठेकेदारालाही कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. सीसीटीव्ही फुटेजमुळे आरोपीचा शोध घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाल्यानंतर रेल्वे अधिकाऱ्यांनी स्थानकावरील सीसीटीव्ही फुटेजची बारकाईने तपासणी केली. त्यातून संबंधित विक्रेत्याची ओळख निश्चित करण्यात आली आणि त्याला तात्काळ ताब्यात घेण्यात आले. पुढील कायदेशीर कार्यवाहीसाठी त्याला रेल्वे सुरक्षा दलाच्या (आरपीएफ) स्वाधीन करण्यात आले असून, रेल्वे कायद्यानुसार विविध कलमांखाली चौकशी सुरू असल्याची माहिती प्रशासनाने दिली. खाद्य स्टॉल तात्पुरता बंद प्राथमिक चौकशी सुरू असतानाच संबंधित खाद्यपदार्थ विक्री स्टॉल तात्पुरता बंद करण्यात आला आहे. चौकशी पूर्ण होईपर्यंत स्टॉल सील ठेवण्याचा निर्णय रेल्वे प्रशासनाने घेतला असून, भविष्यात अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी कठोर पावले उचलण्याचा इशाराही देण्यात आला आहे. ठेकेदारालाही नोटीस या प्रकरणात केवळ विक्रेत्यावरच नव्हे तर संबंधित ठेकेदारावरही जबाबदारी निश्चित करण्यात येत आहे. "परवाना का रद्द करण्यात येऊ नये?" अशी कारणे दाखवा नोटीस संबंधित ठेकेदाराला बजावण्यात आली असून, संपूर्ण घटनेबाबत सविस्तर स्पष्टीकरण सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. रेल्वे प्रशासनाच्या माहितीनुसार, ठेकेदाराचे उत्तर समाधानकारक नसल्यास त्याचा परवाना कायमस्वरूपी रद्द करण्यासह आर्थिक दंडात्मक कारवाईही केली जाऊ शकते. प्रवाशांच्या आरोग्याशी तडजोड नाही या घटनेनंतर भुसावळ रेल्वे प्रशासनाने स्पष्ट केले की, प्रवाशांचे आरोग्य आणि सुरक्षा ही सर्वोच्च प्राथमिकता असून त्यात कोणतीही तडजोड सहन केली जाणार नाही. स्थानक परिसरातील सर्व अधिकृत स्टॉलधारकांनी स्वच्छता, अन्नाची गुणवत्ता आणि परवान्याच्या अटींचे काटेकोर पालन करणे बंधनकारक असल्याचेही प्रशासनाने बजावले आहे.

# ऑल इंडिया पँथरची 'संविधान बचाव-आरक्षण बचाव' यात्रा!

## विविध मागण्यांसाठी सरकारला इशारा

जन सम्राट टाईम्स

**धुळे | प्रतिनिधी :** संविधानिक हक्कांचे संरक्षण, सामाजिक न्यायाची अंमलबजावणी आणि आरक्षण व्यवस्थेच्या समर्थनार्थ ऑल इंडिया पँथर सेनेच्या वतीने धुळे शहरात 'संविधान बचाव-आरक्षण बचाव' यात्रेचे आयोजन करण्यात आले. संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. दीपकमाई केदार यांच्या प्रमुख उपस्थितीत निघालेल्या या यात्रेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी, बौद्ध बांधव आणि शेकडो कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. यात्रेत महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष विनोद भोळे, महाराष्ट्र संयोजक माधव भालेराव, युवा विदर्भ अध्यक्ष संकेत जाधव, धुळे जिल्हाध्यक्ष सागर मोहिते यांच्यासह अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते सहभागी झाले होते. संविधानिक मूल्यांची जनजागृती करणे, अनुसूचित जाती-जमातींच्या आरक्षणाबाबत समाजात जागरूकता निर्माण करणे आणि सामाजिक समतेचा संदेश पोहोचवणे हा यात्रेचा प्रमुख उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले. यावेळी मार्गदर्शन करताना राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. दीपकमाई केदार यांनी भारतीय संविधानाने दिलेले आरक्षण हे सामाजिक न्यायाचे प्रभावी साधन असून वंचित समाजाच्या प्रगतीसाठी ते अत्यंत महत्त्वाचे असल्याचे स्पष्ट केले. संविधानिक अधिकारांचे रक्षण करण्यासाठी समाजाने संघटित होऊन लोकशाही मार्गाने संघर्ष करणे ही काळाची गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले. यात्रेदरम्यान शासनासमोर चार महत्त्वाच्या मागण्या मांडण्यात आल्या. अनुसूचित जाती (एससी) आरक्षणाचे उपवर्गीकरण रद्द करण्यात यावे, शहीद सोमनाथ सूर्यवंशी यांच्या हत्येतील दोषींना फाशीची शिक्षा देण्यात यावी,





देशातील निवडणुका ईव्हीएमऐवजी बॅलेट पेपरवर घेण्यात याव्यात तसेच बुद्धगया महाविहाराचा ताबा बौद्ध समाजाकडे सोपविण्यात यावा, अशा प्रमुख मागण्या संघटनेने केल्या.

### कार्यकर्ते आणि नागरिक सहभागी


यावेळी उपस्थित नागरिकांनी संविधान, समता, बंधुता, सामाजिक न्याय आणि मानवाधिकारांच्या संरक्षणासाठी एकजुटीने लढा उभारण्याचा निर्धार व्यक्त केला. शासनाने या मागण्यांवर तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अन्यथा राज्यभर लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी दिला. या पदयात्रेत राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. दीपक केदार, जिल्हाध्यक्ष सागर मोहिते, प्रवीण शिंदे, विशाल वाघ, कृष्णा पारधी, सतीश पाटील, रद्दशील सोनवणे, दीपक वाडीले, गणेश वाघ, निलेश इंदवे, अशोक करंजे, युवराज बाविस्कर, आबा अमृतसागर, बंटी मगरे, दादा सोनवणे, सम्राट देवरे, पूजाताई चव्हाण, ललिता जाधव, गौरव गवळी, यशवंत दुसाने, राहुल वाघ, नितीन म्हसदे, छोटूभाई साने, कुणाल साने, अश्फाक शेख यांच्यासह असंख्य कार्यकर्ते आणि नागरिक सहभागी झाले होते.

जन सम्राट टाईम्स — अँकर न्यूज

# केळी उत्पादकांना दिलासा? कृषिमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय बैठक

## पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या पुढाकाराने मंत्रालयात होणार आढावा!

जन सम्राट टाईम्स



**पाळधी/जळगाव, | प्रतिनिधी :** जळगाव जिल्ह्यात २३ मे ते ६ जून २०२६ या कालावधीत वादळी वारे आणि अवकाळी पावसामुळे केळी उत्पादक शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने या प्रश्नाची गंभीर दखल घेतली आहे. जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांच्या पुढाकाराने उद्या (दि. १० जून) सकाळी ११ वाजता मंत्रालयात कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. राज्य मंत्रिमंडळाच्या आज झालेल्या बैठकीत पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमोर जळगाव जिल्ह्यातील केळी उत्पादक शेतकऱ्यांच्या नुकसानीचा मुद्दा प्रभावीपणे मांडला.

यानंतर मुख्यमंत्र्यांनी या प्रकरणाची तातडीने दखल घेत कृषिमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली बैठक बोलावून परिस्थितीचा सविस्तर आढावा घेण्याचे निर्देश दिले. जळगाव जिल्ह्यातील रावेर, मुक्ताईनगर, चोपडा यांसह विविध तालुक्यांमध्ये गेल्या काही दिवसांत आलेल्या वादळी वाऱ्यांनी आणि अवकाळी पावसाने केळी बागांचे मोठे नुकसान केले आहे. विशेषतः रावेर आणि मुक्ताईनगर तालुक्यात हजारो एकरांवरील केळी पीक जमीनदोस्त झाल्याने शेतकऱ्यांचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाल्याचे प्राथमिक अंदाज आहेत. उद्या होणाऱ्या बैठकीत २३ मे ते ६ जून या कालावधीत झालेल्या नुकसानीचा सविस्तर आढावा घेतला जाणार असून, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीची मदत कशी देता येईल यावर चर्चा होणार आहे. तसेच पीक विमा योजनेंतर्गत दावे, नुकसानभरपाई, पंचनामे, विमा कंपन्यांची भूमिका आणि मदत वितरणाची प्रक्रिया वेगवान करण्याबाबतही विचारविनिमय अपेक्षित आहे. या बैठकीस फलोत्पादन मंत्री भरत गोगावले, पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा जळगावचे पालकमंत्री गुलाबराव पाटील, वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे, मुक्ताईनगरचे आमदार चंद्रकांत पाटील, रावेरचे आमदार अमोल जावळे, कृषी विभागाचे वरिष्ठ अधिकारी तसेच विविध विमा कंपन्यांचे राज्यस्तरीय आणि जिल्हास्तरीय प्रतिनिधी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे सहभागी होणार आहेत.

### बैठकीकडे संपूर्ण जिल्ह्याचे लागले लक्ष

पालकमंत्री गुलाबराव पाटील, आमदार चंद्रकांत पाटील आणि आमदार अमोल जावळे यांनी नुकसानग्रस्त भागांची पाहणी करून शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी सातत्याने शासनाकडे पाठपुरावा केला आहे. त्यांच्या प्रयत्नांमुळे हा प्रश्न राज्य शासनाच्या सर्वोच्च पातळीवर पोहोचला असून, त्यानंतर तातडीने उच्चस्तरीय बैठक आयोजित करण्यात आल्याने शेतकऱ्यांमध्ये आशेचे वातावरण निर्माण झाले आहे. जळगाव जिल्ह्याची अर्थव्यवस्था मोठ्या प्रमाणावर केळी उत्पादनावर अवलंबून असल्याने या बैठकीकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा देणारे ठोस निर्णय या बैठकीतून होतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात असून, शासनाच्या पुढील निर्णयांवर हजारो केळी उत्पादक शेतकऱ्यांचे भवितव्य अवलंबून राहणार आहे.

# अमळनेर–धुळे महामार्गावर हॉटेल वृंदावनसमोर भीषण तिहेरी अपघात!

## सहा जणांचा जागीच मृत्यू, एक जखमी

जन सम्राट टाईम्स

**अमळनेर| प्रतिनिधी:** धुळे राष्ट्रीय महामार्गावर मंगरूळ गावाजवळ मंगळवारी सकाळी झालेल्या भीषण तिहेरी अपघातात सहा जणांचा जागीच मृत्यू झाल्याने परिसरात शोककळा पसरली आहे. कार, मोटरसायकल आणि राज्य परिवहन महामंडळाच्या बसमध्ये झालेल्या या भीषण धडकेत एक जण गंभीर जखमी झाला असून, अपघातानंतर काही काळ महामार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली होती. मिळालेल्या माहितीनुसार, सकाळी सुमारे सात वाजण्याच्या सुमारास मोटरसायकल (क्र. एमएच १८ सी ८७१९) आणि एसटी बस (क्र. एमएच १३ सीयू ७५४०) अमळनेरहून धुळ्याकडे जात होत्या. त्याचवेळी धुळ्याकडून अमळनेरच्या दिशेने भरधाव वेगाने येणाऱ्या कारने (क्र. जीजे १९ एएफ ३१४७) नियंत्रण गमावल्याने मोटरसायकल आणि एसटी बसला जोरदार धडक दिली. धडक इतकी प्रचंड होती की मोटरसायकलचा अक्षरशः चेंदामेंदा झाला. या भीषण अपघातात धरणगाव येथील




मोटरसायकलस्वाराचा जागीच मृत्यू झाला. तसेच कारमधील पाच प्रवाशांनीही घटनास्थळीच अखेरचा श्वास घेतला. मृतांमध्ये गुजरात राज्यातील व्यारा येथील आदित्य चंद्रकांत महाजन, अनिता सुरेश महाजन, निर्मला नंदलाल महाजन, नंदलाल गोपाल महाजन आणि सुरेश विक्रम महाजन यांचा समावेश आहे. प्राथमिक माहितीनुसार, हे सर्वजण अमळनेर येथे एका साखरपुडा समारंभासाठी येत होते. अपघाताची माहिती मिळताच ११२ आपत्कालीन सेवेच्या माध्यमातून पोलीस आणि मदत पथके तात्काळ घटनास्थळी दाखल झाली. पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम, हेडकॉन्स्टेबल कैलास शिंदे, रवी पाटील तसेच पोलीस पाटील भागवत पाटील यांनी स्थानिक नागरिकांच्या मदतीने बचावकार्य सुरू केले. जखमींना १०८ रुग्णवाहिकेद्वारे तातडीने उपचारासाठी रुग्णालयात हलविण्यात आले. अपघातानंतर कारमध्ये एक लहान मुलगा अडकून पडल्याचे निदर्शनास आले. गावकरी, पोलीस कर्मचारी आणि एसटी कर्मचाऱ्यांनी प्रसंगावधान राखत संयुक्तपणे प्रयत्न करून त्या मुलाची सुखरूप सुटका केली. या दुर्घटनेत एसटी बसमधील दीपक दिलीप पाटील हे जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. अपघातामुळे अमळनेर–धुळे महामार्गावर काही काळ वाहतूक ठप्प झाली होती. पोलिसांनी तातडीने घटनास्थळी पंचनामा करून अपघातग्रस्त वाहने बाजूला हटविली आणि वाहतूक सुरळीत केली. मृतदेह शवविच्छेदनासाठी अमळनेर ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आले असून या भीषण अपघाताचा पुढील तपास अमळनेर पोलीस करीत आहेत. या दुर्दैवी घटनेमुळे अमळनेर, धरणगाव तसेच गुजरातमधील व्यारा परिसरात शोककळा पसरली असून, एका कुटुंबावर काळाने घातलेल्या या घाल्यामुळे सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

### स्थानिक नागरिकांच्या मदतीने बचावकार्य

धुळ्याकडून अमळनेरच्या दिशेने भरधाव वेगाने येणाऱ्या कारने (क्र. जीजे १९ एएफ ३१४७) नियंत्रण गमावल्याने मोटरसायकल आणि एसटी बसला जोरदार धडक दिली. धडक इतकी प्रचंड होती की मोटरसायकलचा अक्षरशः चेंदामेंदा झाला. या भीषण अपघातात धरणगाव येथील मोटरसायकलस्वाराचा जागीच मृत्यू झाला. तसेच कारमधील पाच प्रवाशांनीही घटनास्थळीच अखेरचा श्वास घेतला. मृतांमध्ये गुजरात राज्यातील व्यारा येथील आदित्य चंद्रकांत महाजन, अनिता सुरेश महाजन, निर्मला नंदलाल महाजन, नंदलाल गोपाल महाजन आणि सुरेश विक्रम महाजन यांचा समावेश आहे. प्राथमिक माहितीनुसार, हे सर्वजण अमळनेर येथे एका साखरपुडा समारंभासाठी येत होते. अपघाताची माहिती मिळताच ११२ आपत्कालीन सेवेच्या माध्यमातून पोलीस आणि मदत पथके तात्काळ घटनास्थळी दाखल झाली. पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम, हेडकॉन्स्टेबल कैलास शिंदे, रवी पाटील तसेच पोलीस पाटील भागवत पाटील यांनी स्थानिक नागरिकांच्या मदतीने बचावकार्य सुरू केले. जखमींना १०८ रुग्णवाहिकेद्वारे तातडीने उपचारासाठी रुग्णालयात हलविण्यात आले.

# रायगडच्या पालकमंत्री पदावरून शिवसेना आक्रमक

## शिवसेनेकडून पालकमंत्रीपदावर दावा

जन सम्राट टाईम्स

**अलिबाग। प्रतिनिधी** : विधानपरिषद निवडणुकीत कोकणची जागा राष्ट्रवादी काँग्रेसच्या अनिकेत तटकरे यांच्यासाठी सोडल्यानंतर, आता रायगडच्या पालकमंत्री पदावर शिवसेना शिंदे गटाने दावा करण्यास सुरूवात केली आहे. आमदार निलेश राणे यांच्या पाठोपाठ आता उद्योग मंत्री उदय सामंत यांनी रायगडचे पालकमंत्रीपद गोगावले मिळायला हवे असे मत व्यक्त केले आहे लवकरच मुख्यमंत्र्यांकडे यासंदर्भात मागणी करणार असल्याचेही म्हटले आहे. विधानपरिषदेचेच्या कोकण स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघासाठी निवडणुक नुकतीच पार पडली. राष्ट्रवादी काँग्रेसचे अनिकेत तटकरे या मतदारसंघातून बिनविरोध निवडून आले.

शिवसेना शिंदे गटाकडून जुईली दळवी यांनी माघार घेतल्याने, अनिकेत तटकरे यांचा विधानपरिषदेचा मार्ग सुकर झाला. महाविकास आघाडीच्या उमेदवारांनी शेवटच्या क्षणी निवडणुकीतून काढता पाय घेतला आणि ही निवडणूक नाट्यमय रित्या बिनविरोध झाली. खरे तर शिवसेना शिंदे गट या जागेसाठी आग्रही



होता. कारण कोकणात सर्वाधिक स्थानिक स्वराज्य संस्थाचे सदस्य शिवसेना शिंदे गटाचे होते. त्या खालोखाल भाजप आणि नंतर राष्ट्रवादी काँगेसचे सदस्य होते. त्यामुळे ही जागा शिवसेना शिंदे गटाला मिळावी अशी मागणी शिवसेना नेत्यांनी लावून धरली होती.

राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी राजकीय वजन वापरून मुलासाठी मिळवली. ज्यामुळे शिवसेना शिंदे गटात कमालीची नाराजी होती. रायगडच्या पालकमंत्रीपदावरून तडझोड होऊन शिवसेना शिंदे गटाने माघार घेतल्याचे सांगितले जात आहे.विधानपरिषद निवडणुक बिनविरोध झाल्यानंतर लगेचच आता रायगडच्या पालकमंत्रीपदासाठी शिवसेना शिंदे गटाने जोर लावण्यास सुरूवात केली आहे. निलेश राणे यांनी दोन दिवसापूर्वीच आता रायगडचे पालकमंत्रीपद तटकरे यांनी शिवसेनेच्या भरत गोगावले यांच्याकडे सोपवावे अशी मागणी केली होती. आता उद्योगमंत्री उदय सामंत यांनी याच मागणीचा पुर्नउच्चार केला आहे. शब्द दिल्या प्रमाणे राष्ट्रवादी काँग्रेसच्या तटकरे यांनी आता पालकमंत्रीपदाचा आग्रह सोडायला हवा असे मत त्यांनी व्यक्त केले आहे. पालकमंत्रीपदाबाबत जी काही चर्चा झाली. जे शब्द दिले गेले ते आता निवडणुक बिनविरोध झाली म्हणून विसरून चालणार नाही. आम्ही लवकरच मुख्यमंत्र्यांना भेटून ही नियुक्ती करण्याची मागणी करणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज ज

# रोटवदच्या तरुणाचा अज्ञात वाहनाच्या धडकेत दुर्दैवी मृत्यू

## तीन वर्षांचा चिमुकला मुलगा पोरका

जन सम्राट टाईम्स

**रोटवद । प्रतिनिधी :** रोटवद गावातील ३२ वर्षीय तरुणाचा अज्ञात वाहनाच्या धडकेत दुर्दैवी मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना समोर आली आहे. चेतन शांताराम महाजन (वय ३२) हे अमळनेर येथील आर्मी स्कूलमध्ये शिपाई पदावर कार्यरत होते. सोमवारी (दि. ८ जून २०२६) सायंकाळी सुमारे सहा ते आठ वाजण्याच्या दरम्यान घरी परतत असताना पातोंडा-नांद्री परिसरात अज्ञात वाहनाने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. मिळालेल्या माहितीनुसार, चेतन महाजन हे नेहमीप्रमाणे काम आटोपून आपल्या दुचाकीवरून (क्र. MH-19-DT-5240) रोटवदकडे परतत होते. दरम्यान, पातोंडा आणि नांद्री गावाजवळ भरधाव वेगाने आलेल्या अज्ञात वाहनाने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. धडकेनंतर वाहनचालक घटनास्थळावरून पसार झाल्याचे सांगितले जात आहे.अपघातानंतर चेतन महाजन यांची दुचाकी रस्त्याच्या कडेला असलेल्या खड्डयात (बरसात) पडलेल्या अवस्थेत आढळून आली. घटनेची माहिती मिळताच रोटवद येथील शेकडो ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेतली. परिसरात शोककळा पसरली असून गावकऱ्यांनी




हळहळ व्यक्त केली. चेतन महाजन यांच्या अकाली निधनामुळे त्यांच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. त्यांच्या पश्चात आई, पत्नी आणि अवघ्या तीन वर्षांचा गोंडस मुलगा असा परिवार असून कुटुंबाचा आधारवड हरपल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

घटनेनंतर पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करून पुढील तपास सुरू केला असून, धडक देऊन पसार झालेल्या अज्ञात वाहनाचा आणि चालकाचा शोध घेण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तसेच अन्य तांत्रिक पुराव्यांच्या आधारे तपासाची चक्रे फिरवली जात असल्याची माहिती मिळत आहे. या अपघातामुळे रोटवद आणि परिसरात शोककळा पसरली असून, भरधाव वाहनचालकांवर कठोर कारवाई करण्याची तसेच या मार्गावरील वाहतूक सुरक्षिततेच्या उपाययोजना अधिक प्रभावीपणे राबविण्याची मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

# धुळ्यात सैन्यदलातील जवानांची कथित फसवणूक; सहा महिन्यांत बंगल्यांना तडे, निकृष्ट बांधकामाचा आरोप

## खाजगी कंत्राटदार व अभियंत्यावर कारवाईची मागणी; नुकसान मांडताना जवानांना अश्रू अनावर

जन सम्राट टाईम्स

**धुळे । प्रतिनिधी :** देशाच्या सीमेवर अहोरात्र सेवा बजावणाऱ्या सैन्यदलातील जवानांनाच खाजगी कंत्राटदाराच्या कथित निष्काळजीपणा आणि निकृष्ट बांधकामाचा फटका बसल्याची धक्कादायक घटना धुळे शहरात उघडकीस आली आहे. अवघ्या चार ते सहा महिन्यांपूर्वी उभारण्यात आलेल्या दोन बंगल्यांना मोठ्या प्रमाणात तडे गेल्याने लाखो रुपयांचे नुकसान झाले असून, संबंधित कंत्राटदार आणि अभियंत्यावर कठोर कारवाई करण्याची मागणी पीडित जवानांनी केली आहे. ही घटना धुळे शहरातील पारोळा रोड परिसरातील रामचंद्र नगर येथे घडली आहे. मूळ धुळे तालुक्यातील आंबोडे गावचे रहिवासी असलेले आणि सध्या रामचंद्र नगर येथे वास्तव्यास असलेले सीमा सुरक्षा दल (बीएसएफ) जवान विनोद चिंतामण बोरसे तसेच सैन्यदलातील सेवानिवृत्त जवान कृष्णा शिंदे यांनी काही महिन्यांपूर्वी आपल्या स्वप्नातील घराच्या बांधकामाची जबाबदारी फागणे



येथील खाजगी कंत्राटदार महेंद्र काशिनाथ पाटील आणि अभियंता युवराज सूर्यवंशी यांच्याकडे सोपविली होती. माहितीनुसार, कृष्णा शिंदे यांनी सुमारे १६ लाख रुपयांत एक हजार चौरस फूट क्षेत्रफळाचे, तर बीएसएफ जवान विनोद बोरसे यांनी १७ लाख रुपयांत बारा शे चौरस फूट क्षेत्रफळाचे घर बांधण्याचे काम संबंधित कंत्राटदाराकडे दिले होते. यासंदर्भातील करार स्टॅम्प व नोटरीद्वारे करण्यात आला होता. मात्र, बांधकाम पूर्ण झाल्यानंतर अवघ्या पाच ते सहा महिन्यांतच दोन्ही बंगल्यांच्या भिंतींना मोठ्या प्रमाणात तडे जाऊ लागले. त्यामुळे संपूर्ण बांधकामाच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून निकृष्ट साहित्य आणि दोषपूर्ण कामामुळेच ही परिस्थिती निर्माण झाल्याचा आरोप जवानांनी केला आहे. याबाबत संबंधित कंत्राटदाराला वारंवार माहिती देऊनही कोणतीही ठोस दखल घेतली जात नसल्याचा आरोप पीडितांनी केला आहे. उलट वारंवार टाळाटाळ केली जात असल्याने न्याय मिळावा या अपेक्षेने जवानांनी प्रसारमाध्यमांसमोर आपली व्यथा मांडली. झालेल्या आर्थिक आणि मानसिक नुकसानीचा पाढा वाचताना दोन्ही जवानांना अश्रू अनावर झाल्याचे हृदयद्रावक चित्र पाहायला मिळाले. देशसेवेसाठी आयुष्य समर्पित केलेल्या जवानांच्या बाबतीत असा प्रकार घडणे दुर्दैवी असल्याची भावना स्थानिक नागरिकांनी व्यक्त केली आहे. संबंधित प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषी कंत्राटदार व अभियंत्यावर कायदेशीर कारवाई करण्यात यावी तसेच झालेल्या नुकसानीची भरपाई मिळावी, अशी मागणी पीडित जवानांनी प्रशासनाकडे केली आहे. दरम्यान, या प्रकरणामुळे शहरातील बांधकामांच्या गुणवत्तेबाबतही प्रश्न उपस्थित होत असून, नागरिकांनी घरबांधणी करताना संबंधित कंत्राटदार व अभियंत्यांची विश्वासार्हता तपासूनच व्यवहार करावेत, अशी चर्चा परिसरात सुरू आहे.

# शेतात सहा महिन्यांच्या बिबट्याच्या पिल्लाचा मृतदेह; देशशिरवाडे गावात खळबळ

जन सम्राट टाईम्स

**धुळे । प्रतिनिधी :** पिंपळनेर परिसरातील देशशिरवाडे गावात शेतामध्ये नर जातीच्या सुमारे सहा महिन्यांच्या बिबट्याच्या पिल्लाचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. घटनेची माहिती मिळताच पिंपळनेर वनविभागाचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले आणि मृत बिबट्याच्या पिल्लाचा ताबा घेत शवविच्छेदनाची प्रक्रिया पूर्ण केली. प्राथमिक वैद्यकीय तपासणीत उष्माघातामुळे या पिल्लाचा मृत्यू झाल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला असून, नेमक्या कारणांचा अधिकृत अहवाल येणे बाकी आहे. माहितीनुसार, देशशिरवाडे गावातील एका शेतकऱ्याला उसाच्या शेतालगत असलेल्या क्षेत्रात बिबट्याचे पिल्लू मृतावस्थेत दिसून आले. हा प्रकार लक्षात येताच संबंधित शेतकऱ्याने तातडीने वनविभागाला माहिती दिली. काही वेळातच ही बातमी संपूर्ण गावात पसरली आणि घटनास्थळी ग्रामस्थांनी मोठी गर्दी केली. वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी पोहोचून परिसराची पाहणी केली तसेच मृत बिबट्याच्या पिल्लाचा पंचनामा करून शवविच्छेदनासाठी आवश्यक प्रक्रिया पूर्ण केली. प्राथमिक तपासणीत अन्न व पाण्याच्या शोधात जंगलातून बाहेर पडलेल्या या पिल्लाला तीव्र उष्णतेचा फटका बसल्याने उष्माघात झाला असावा, असा अंदाज पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे. मात्र अंतिम निष्कर्ष शवविच्छेदन अहवालानंतरच स्पष्ट होणार असल्याचे वनविभागाने सांगितले. दरम्यान, पिंपळनेर परिसरात बिबट्यांच्या वावराच्या घटना नवीन नाहीत. गेल्या काही वर्षांत अनेक वेळा बिबटे गावाच्या हद्दीत शिरल्याच्या घटना समोर आल्या आहेत. काही प्रकरणांमध्ये विहिरींमध्ये पडून बिबट्यांचा मृत्यू झाल्याच्याही घटना घडल्या आहेत. त्यामुळे वन्यजीव आणि मानवी वस्ती यांच्यातील वाढता संघर्ष पुन्हा एकदा चर्चेचा विषय ठरला आहे. स्थानिक शेतकरी आणि ग्रामस्थांनी या घटनेनंतर वनविभागाने दीर्घकालीन उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. विशेषतः शेतातील उघड्या विहिरींना संरक्षणात्मक कठडे उभारणे, जंगलालगतच्या भागात नियमित गस्त वाढवणे आणि बिबट्यांच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी आधुनिक यंत्रणा उभारणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.

# लाच स्वीकारताना वनरक्षक रंगेहात जाळ्यात

## शहादा वन परिक्षेत्रात खळबळ

जन सम्राट टाईम्स

**शहादा | प्रतिनिधी :** नंदुरबार जिल्ह्यातील शहादा वन परिक्षेत्रातील कोंढवळ बीटच्या वनरक्षकाला १७ हजार रुपयांची लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) रंगेहात पकडल्याने वन विभागात एकच खळबळ उडाली आहे.सरकारी कामकाजात कोणतीही कायदेशीर कारवाई न करण्याच्या मोबदल्यात लाचेची मागणी केल्याचा आरोप संबंधित वनरक्षकावर असून, या प्रकरणी भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दिलेल्या माहितीनुसार, तेजस्विनी काळू साळुंखे (पाटील) या शहादा वन परिक्षेत्रातील कोंढवळ बीट येथे वनरक्षक म्हणून कार्यरत आहेत. एका ३२ वर्षीय तक्रारदाराकडून त्यांनी १७ हजार ५०० रुपयांची लाच मागितल्याची तक्रार ४ जून २०२६ रोजी नंदुरबार येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे दाखल करण्यात आली होती.तक्रारदार ग्रामपंचायतीच्या परवानगीने शेतीच्या बांधावरील तसेच माळरानावरील काटेरी बाभूळ झाडे तोडून त्यांची गुजरात राज्यात विक्रीसाठी वाहतूक करत होते. या वाहतुकीदरम्यान त्यांच्या चारचाकी वाहनावर कोणतीही कायदेशीर कारवाई न करण्याच्या बदल्यात वनरक्षकांनी लाचेची मागणी केल्याचा आरोप करण्यात आला आहे. तक्रारीची पडताळणी करताना एसीबीच्या अधिकाऱ्यांनी संपूर्ण व्यवहाराची शहानिशा केली. तपासादरम्यान सुरुवातीला १७ हजार ५०० रुपयांची मागणी करण्यात आल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर तडजोडीनंतर १७ हजार रुपये स्वीकारण्यास संबंधित वनरक्षक तयार झाल्याचेही पडताळणीत स्पष्ट झाले. याआधारे ९ जून २०२६ रोजी शहादा-शिरपूर मार्गावरील फेस फाटा परिसरात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सापळा रचला. पंचांच्या उपस्थितीत तक्रारदाराकडून १७ हजार रुपयांची लाच स्वीकारताना वनरक्षक तेजस्विनी साळुंखे यांना रंगेहात पकडण्यात आले. कारवाईदरम्यान लाचेची संपूर्ण रक्कम जप्त करण्यात आली असून आरोपीकडील Xiaomi कंपनीचा मोबाईल फोनही ताब्यात घेण्यात आला आहे. याशिवाय घरझडतीची कार्यवाहीही सुरू असल्याची माहिती अधिकृत सूत्रांनी दिली. या प्रकरणी सारंगखेडा पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ च्या कलम ७ अन्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून आरोपीला ताब्यात घेण्यात आले आहे. ही धडक कारवाई पोलीस उपअधीक्षक प्रशांत भरते यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली असून पुढील तपास पोलीस निरीक्षक विकास लोंढे करीत आहेत. दरम्यान, वनरक्षकावर झालेल्या या कारवाईमुळे शहादा वन परिक्षेत्रासह संपूर्ण वन विभागात खळबळ उडाली आहे. सरकारी यंत्रणांमधील भ्रष्टाचाराविरोधात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पुन्हा एकदा कठोर भूमिका घेतल्याचे या कारवाईतून स्पष्ट झाले.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज ज

# जागतिक पर्यावरण दिनानिमित्त इंटककडून पिसोळीत 250 वृक्षांचे रोपण

## अ‍ॅड. धनंजय बुद्धिवंत यांच्या हस्ते सुमारे २५० विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड

जन सम्राट टाईम्स

**पुणे । प्रतिनिधी:** जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून भारतीय राष्ट्रीय मजदूर काँग्रेस (महासंघ) – इंटकच्या वतीने पिसोळी येथील नानासाहेब बुद्धिवंत नगर परिसरात भव्य वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी इंटकचे पुणे जिल्हाध्यक्ष अ‍ॅड. धनंजय बुद्धिवंत यांच्या हस्ते सुमारे २५० विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड करण्यात आली. या उपक्रमात पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत परिसर अधिक हिरवागार करण्याचा संकल्प करण्यात



आला. कार्यक्रमाला पुणे शहराध्यक्ष इमरान शेख, पुणे शहर महिला कार्याध्यक्ष अलिशा बुद्धिवंत, पुणे शहर महिला अध्यक्षा मुमताज शेख, पुणे जिल्हा महिला सचिव मेघा शेगर, रमेश तिवारी, हुजेर शेख यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बोलताना अ‍ॅड. धनंजय बुद्धिवंत म्हणाले की, “निसर्गाचे रक्षण ही प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे. वाढते प्रदूषण आणि हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर वृक्षारोपण करणे ही केवळ सामाजिक जबाबदारी नसून काळाची गरज बनली आहे. प्रत्येकाने किमान एक झाड लावून त्याचे संगोपन करण्याचा संकल्प केला पाहिजे.” या वृक्षारोपण मोहिमेद्वारे पर्यावरण संरक्षणाबाबत जनजागृती करण्याबरोबरच भविष्यातही अशाच सामाजिक उपक्रमांचे सातत्याने आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

### कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित

जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून भारतीय राष्ट्रीय मजदूर काँग्रेस (महासंघ) – इंटकच्या वतीने पिसोळी येथील नानासाहेब बुद्धिवंत नगर परिसरात भव्य वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी इंटकचे पुणे जिल्हाध्यक्ष अ‍ॅड. धनंजय बुद्धिवंत यांच्या हस्ते सुमारे २५० विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड करण्यात आली. या उपक्रमात पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत परिसर अधिक हिरवागार करण्याचा संकल्प करण्यात आला. कार्यक्रमाला पुणे शहराध्यक्ष इमरान शेख, पुणे शहर महिला कार्याध्यक्ष अलिशा बुद्धिवंत, पुणे शहर महिला अध्यक्षा मुमताज शेख, पुणे जिल्हा महिला सचिव मेघा शेगर, रमेश तिवारी, हुजेर शेख यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.